## प्रकरण चार

## एकात्मिक बालविकास सेवा योजना विभाग (परिच्छेद क्रमांक 4.581 ते 4.590)

**4.581 पोषण अभियानाची राज्यात अंमलबजावणी करणेबाबत.**

**पंचायत समिती अहिल्यानगर, जिल्हा अहिल्यानगर, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 10)**

पंचायत समिती अहिल्यानगर यांनी सन 2021-22 मध्ये एकात्मिक बालविकास विभागाकडील अंगणवाडी साठी सीबीई कार्यक्रमांतर्गत रक्कम रुपये 2,02,800/- व रुपये 50,700/- असे एकूण 2,53,500/- अनुदान वितरीत केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एबावि-2018/प्र.क्र.27/का.6 दिनांक 11 जुलै 2018 मधील 4(3)(अ) नुसार प्रत्येक अंगणवाडी केंद्रात दरमहा सामुदायिक कार्यक्रमांचे उदाहरण ओटीभरण, अन्न प्राशन, सुपोषण दिवस, अंगणवाडी प्रवेशोत्सव इत्यादी आयोजन करण्यात येणार असून, त्यासाठी रक्कम रुपये 250/- प्रतिमहा प्रति अंगणवाडी उपलब्ध करुन देणे आवश्यक असताना विभागाने प्रति अंगणवाडी रुपये 500/- प्रमाणे प्रतिमहा 2 कार्यक्रम याप्रमाणे अनुदान वाटप केले आहे. प्रति अंगणवाडी रुपये 500/- अनुदान कोणत्या प्राधिकारान्वये वितरीत केले याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

**4.582 प्रवासभत्ता देयकातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती गगनबावडा, जिल्हा कोल्हापूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 8)**

पंचायत समिती गगनबावडा यांचे 2021-22 या वर्षातील प्रवासभत्ता देयकांची तपासणी केली असता आढळलेल्या अनियमिततांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. मुळ परिच्छेदातील तक्त्यात दर्शविलेली सर्व 124 देयके ही एक/तीन वर्षापेक्षा अधिक कालावधीची असुन सदर देयकांवर अनुदान उपलब्ध नसलेमुळे प्रलंबीत असे नमुद केले आहे तथापी प्रवासभत्ता देयक नोंदवही लेखापरीक्षणास उपलबध न झाल्याने देयके ज्या त्या आर्थिक वर्षात कार्यालयास प्राप्त होती किंवा कशी याची तपासणी करता आली नाही.

2. सदर देयकांकरीता अनुदान उपलब्ध नसलेस देयके सादर झालेनंतर पारीत केली नसलेस त्याबाबतची नोंद नमुना 12 नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. नोंदवही उपलबध झाली नसल्यामुळे देयके कधी परत केली हे समजून येत नाही.

3. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 44 व 45 नुसार एक वर्षापेक्षा अधिक कालावधीची असलेने ती जिल्हा परिषद यथास्थिती समितीच्या मंजुरीशिवाय देणेत येणार नाही अशी तरतुद असताना मुख्य कार्यकारी अधिकारी/परिषद यथास्थिती समितीची मंजुरी घेतलेबाबतचे प्राधिकार लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसलेमुळे प्रवास भत्याची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

**4.583 अब्दुल कलाम अमृत आहार योजनेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती चिमुर, जिल्हा चंद्रपूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 17)**

पंचायत समिती चिमुर यांनी सन 2021-22 मध्ये अब्दुल कलाम अमृत आहार योजनेवर एकूण रुपये 1,26,15,715/- खर्च केला आहे. याबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. अमृत आहार योजना टप्पा क्रमांक 1 चे 11,096 पात्र लाभार्थ्यापैकी प्रत्यक्ष 10,175 लाभार्थ्यांना व टप्पा 2 चे 58,863 पात्र लाभार्थ्यापैकी प्रत्यक्ष 57,765 लाभार्थ्यांना लाभ दिला आहे. निधी उपलब्ध असताना नियोजनाच्या अभावामुळे टप्पा 1 चे 921 व टप्पा 2 चे 1,098 लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित आहेत.

2. टप्पा 1 व 2 करीता निधीची मागणी अंगणवाडी स्तरावर किती रक्कम अखर्चित आहे, याची पडताळणी न करता ढोबळमानाने जिल्हा परिषदेला मागणी केली आहे परिणामी अंगणवाडी स्तरावर वर्षानुवर्षे टप्पा 1 व 2 च्या रकमा व त्यावरील व्याज पडून असल्याचे निदर्शनास येते.

3. योजना सुरु झाल्यापासून 31.03.2021 पर्यंत बँक खातेवर किती व्याज प्राप्त झाले या बाबतचा हिशोब प्रकल्प स्तरावर ठेवलेला नाही. तसेच व्याजाची रक्कम परत केली नाही. सन 2021-22 मधील प्राप्त बँक व्याजाची रुपये 3,63,642/- जिल्हा परिषदेला परत केली नाही.

4. उपलब्ध निधी आणि खर्चाच्या विवरणानुसार 31.03.2022 अखेर रुपये 1,34,14,818/- शिल्लक राहणे आवश्यक असताना प्रकल्प कार्यालयाच्या कॅश बुक व बँक खात्याची दिनांक 31.03.2022 ची शिल्लक रक्कम रुपये 1,38,36,768/- आहे. जमा खर्चानुसार प्रत्यक्षात रक्कम रुपये 4,21,950/- ची तफावत आहे.

5. कॅशबुकचा बँक खाते क्रमांकाशी ताळमेळ घेतलेला नाही. शिल्लक रुपये 1,38,36,768/- कोणत्या लेखाशिर्षाची आहे. याबाबत तपशीलवार नोंदी घेतल्या नाही. तसेच सदर अखर्चित रक्कम जिल्हा परिषदेला परत केली नाही.

6. प्रकल्प स्तरावरून आढावा न घेतल्यामुळे अंगणवाडी स्तरावर मोठया प्रमाणात शिल्लक रकमा दिसून येतात तसेच अंगणवाडी स्तरावरील शिल्लक रकमा परत केल्या जात नाहीत.

7. शासन निर्णय आदिवासी विकास विभाग 18 नोव्हेंबर 2015 नुसार आदिवासी समाजातील बाल मृत्यु व कुपोषणाचे प्रमाण कमी करणेसाठी सदर योजना सुरु केल्याचे मुख्यत: दिसून येते. परंतु एकूण पात्र लाभार्थ्यांपैकी आदिवासी लाभार्थ्यांचे प्रमाण 45 टक्केपेक्षा कमी असल्याचे निदर्शनास येते. सदर बाब योजनेच्या मुख्य उद्देशाच्या विसंगत आहे. आदिवासी लाभार्थी शोधुन त्यांना योजनेच्या मुख्य प्रवाहात आणले गेले नाही.

8. उपरोक्त शासन निर्णयानुसार अंगणवाडी केंद्रस्तरीय आहार समितीची बैठक महीन्यातून एकदा घेणे आवश्यक असताना त्या प्रमाणे कार्यवाही केली नाही.

9. सदर योजनेचा गुणात्मक बदला बाबतचा सांख्यिकीय अहवाल विभागाने तयार केला नाही. त्यामुळे योजनेवर झालेल्या खर्चाच्या अनुषंगाने योजनेची फलनिष्पत्ती झाल्याचे दिसून येत नाही.

**4.584 डॉ. अब्दुल कलाम अमृत आहार योजना टप्पा 1 व टप्पा 2 चे निधी मागणीबाबत.**
**पंचायत समिती नागभीड, जिल्हा चंद्रपूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 8)**

पंचायत समिती नागभीड यांनी सन 2021-22 मध्ये डॉ. अब्दुल कलाम अमृत आहार योजने अंर्तगत गरोदर व स्तनदा मातांना एक वेळ चौरस आहार व 7 महिने ते 6 वर्ष वयोगटातील बालकातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी नागभीड तालुक्यातील 66 गावांतील 133 अंगणवाडी केंद्रात भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना टप्पा 1 व टप्पा 2 राबविण्यात आली आहे. त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. डॉ. अब्दुल कलाम पोषण आहार योजनेच्या BOI खाते क्रमांक 20153 मध्ये लेखापरीक्षण दिनांकास रक्कम रुपये 82,72,289/- इतकी मोठी रक्कम शिल्लक आहे.

2. त्यापूर्वी एप्रिल 2021 ते जून 2021 पर्यंत रुपये 40 ते 45 लक्ष आणि जून ते ऑक्टोंबर 2021 पर्यंत रुपये 32 ते 36 लक्ष रुपयाची रक्कम नियमीतपणे बँक खात्यात अखर्चीत पडून आहे.

3. सदर योजनेच्या रोख पुस्तकानुसार सन 2021-22 मध्ये तीन महिन्याचा खर्च सरासरी रुपये 66,37,952/- असताना मार्च 2022 अखेर रुपये 1,39,80,971/- निधी प्राप्त झाला आहे. रुपये 73,43,019/- रुपये बालविकास प्रकल्प अधिकारी, पंचायत समिती नागभिड यांचे कार्यालयाव्दारे जादा मागणी केली आहे. परंतु पासबुकात वर्षभर रुपये 54 लक्ष अतिरिक्त निधी पडून असताना जादा मागणी करुन खर्च केलेला नाही.

3. बँक पासबुक व रोख पुस्तकातील दिनांक 01.04.2021 व दिनांक 31.03.2022 रोजीच्या अखरेच्या शिल्लक रकमेत अनुक्रमे 97,42,177/- व 22,930/- तफावत असल्याचे दिसून येते.

4. सन 2021-22 मध्ये व्याजाची रक्कम रुपये 1,31,597/- प्राप्त असूनही व्याजाचे स्वतंत्र हिशेब ठेवले नाही.

5. दिनांक 31.03.2021 च्या गोषवारा नूसार बँकेत रुपये 28,54,957/- जमा झाली आहे. परंतू सदर रक्कम दिनांक 31.03.2022 ला म्हणजेच तब्बल एक वर्षानंतर रोखवहीत जमा दर्शविली आहे.

**4.585 एकात्मिक बालविकास विभागाअंतर्गत डॉ. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेबाबत.**
**पंचायत समिती कोरपना, जिल्हा चंद्रपूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 3)**

पंचायत समिती कोरपना यांचे सन 2021-22 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात अब्दुल कलाम अमृत आहार योजनेच्या किरकोळ रोकडवहीची तपासणी केली असता तिमाही अनुदान वाटप नोंदीनुसार टप्पा -1 करीता

रक्कम रुपये 1,00,15,875/- व टप्पा-2 करीता रुपये 59,96,160/- असे एकुण रक्कम रुपये 1,60,12,035/- अनुदान वितरीत केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अविवी-2015/प्र.क्र.78/का.8, दिनांक 18.11.2015 नुसार भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना राबविण्याकरिता ग्रामपातळीवर 4 सदस्यीय आहार समितीची स्थापना केल्याचे लेखापरीक्षणात दिसून आले नाही. सदर समितीची अंगणवाडी सेविकांमार्फत महिन्यातून किमान एकदा बैठक होणे आवश्यक असताना नियमित बैठका होत नसल्याचे दिसून येते.

2. शासन निर्देशानुसार आहार योजना टप्पा-1 व टप्पा-2 अंतर्गत खरेदीच्या तसेच लाभार्थींच्या स्वतंत्र नोंदी ठेवणे व त्याचे लेखे आहार समितीस सादर करणे आवश्यक आहे. परंतु अंगणवाडी केंद्रांनी सदर लेख्यांवर आहार समितीच्या स्वाक्षऱ्या घेतल्या नसल्याने ते लेखे आहार समितीकडे मंजूरी करीता सादर केले नसल्याचे स्पष्ट होते.

3. आहार योजनेंतर्गत अंगणवाड्यांसाठी स्थापन केलेल्या आहार समितीच्या बँक खात्यामध्येच अंगणवाडीतील लाभार्थी बालकांच्या संख्येनुसार अनुदान वितरीत न करता ढोबळमानाने अनुदान वितरणाची कार्यवाही बालविकास प्रकल्प अधिकारी यांचे स्तरावरुन केली आहे.

4. सदर योजेनेतंर्गत लाभार्थ्यांची आहार वाटपाची नोंदवही तपासली असता अंडी/केळी वाटप केल्याचे नमुद नाही. तसेच एकाच वेळेस 500 ते 550 अंडी खरेदी केल्याचे दिसुन येते. अंडी/केळी नाशिवंत असल्याने ती ताजी व खाण्यास योग्य असताना वाटप करायची असताना मोठ्या प्रमाणात खरेदी केल्यास व वाटप न झाल्यास खराब होऊ शकतात. तसेच अंडी/केळी साठवणुक कशी केली याबाबत अनुपालन दिले नाही.

5. सदर योजेनेतंर्गत अंगणवाडी केंद्र दुर्गाडी येथील अंगणवाडी सेविकांचे बँक पासबुकाची तपासणी केली असता बँक खात्यातून रक्कम रुपये 2,12,000/- संबंधित पुरवठादारास धनादेशाने प्रदान न करता रोखीने म्हणजेच स्वत: रक्कम काढल्याचे नमूद आहे. त्यामुळे पोषण आहारासंबंधी साहित्य खरेदी केल्याची पडताळणी करता आली नाही.

6. लाभार्थ्यांची नोंदवही तपासली असता बालकाची वाढ, उंची, गरोदर मातेच्या वजनात वाढ, याबाबतची नोंदवही अंगणवाडी स्तरावर ठेवली नाही. तसेच लाभार्थ्यांचा समावेश सॅम/मॅम योजनेत करून अतिरिक्त पोषण आहार तसेच आरोग्य तपासणी केल्याचे नमूद नाही. उपस्थिती रजिस्टरवर गरोदर महीलांना व नवजात बाळांना कोणता/कितवा महीना चालु आहे, महीलांना आहार सुरू केलेल्या दिवसाचे वजन तसेच महीन्याच्या शेवटीचे वजन, महीलांचे हिमोग्लोबिनचे प्रमाण या बाबतच्या नोंदी तसेच टप्पा 2 अंतर्गत आहार वाटप केलेल्या मुलांचे वजन, उंची व हिमोग्लोबिनचे प्रमाण याबाबत नोंदी घेतल्या नाहीत.

7. अंगणवाडी केंद्र दुर्गाडी चे टप्पा 1 अंतर्गत खरेदी केलेले साहित्य पीठ, तांदुळ, डाळ, शेंगदाणे लाडु, अंडी, मिठ, मसाला इत्यादीचे विशाल किराणा स्टोअर्स उपप्रमाणकाची तपासणी केली असता खरेदी केलेल्या साहित्याचे प्रमाण नमुद नाही. तसेच नमुना 33 साठा पुस्तकात खरेदी केलेल्या साहित्याची नोंद नाही व आहार वाटपामध्ये कोणकोणते खाद्य पदार्थ वाटप केले या बाबतची नोंद नाही.

8. रोखपुस्तक अति महत्वाचे अभिलेखे असल्यामुळे सदर पुस्तकातील एकुण पानांची पडताळणी/ मोजणी करून प्रमाणित करणे आवश्यक असताना अंगणवाडी केंद्र धानोरा क्रमांक 1 चे टप्पा 1 व टप्पा 2 रोख पुस्तक तसेच उपस्थिती रजिस्टर प्रमाणित केलेले नाही.

9. आहार वाटप उपस्थिती रजिस्टरवर आहार वाटप केलेले एकुण दिवस व उपस्थिती दिवस, तसेच सुरवातीची शिल्लक, महिन्यात प्राप्त रक्कम, महीन्यात झालेला खर्च व अंतिम शिल्लक यांच्या नोंदी उपस्थिती रजिस्टरवर घेतल्या नाही.

**4.586 डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेबाबत.**

**पंचायत समिती जिवती, जिल्हा चंद्रपूर सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 7)**

पंचायत समिती जिवती यांनी सन 2021-22 मध्ये आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अविवी-2015/प्र.क्र.78/का.8, दिनांक 18.11.2015 नुसार डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृतआहार योजना टप्पा-1 नुसार अनुसुचित क्षेत्रातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळ चौरस आहार देणे, तसेच शासन निर्णय क्रमांक आविवि-2016/प्र.क्र.83/कार्यासन-8, दिनांक 5 ऑगस्ट 2016 नुसार

7 महिने ते 6 वर्ष वयोगटातील सर्व बालकांना अंडी/केळी इत्यादीचा आहार देण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेच्या रोखपुस्तकानुसार दिनांक 31/03/2022 अखेरची शिल्लक रक्कम 76,73,107/- व बँक पासबुकानुसार 1,12,25,113/- असल्यामुळे रक्कम रुपये 35,52,006/- तफावत दिसुन येते.

2. उपरोक्त नमूद शासन निर्णय दिनांक 18 नोव्हेंबर 2015 नुसार अंगणवाडी सेवकांनी खरेदीच्या तसेच लाभार्थींच्या स्वतंत्र नोंदी घेवून त्याचे लेखे आहार समितीस सादर करणे आवश्यक असताना नोंदवहीत आहार समितीच्या स्वाक्षरी घेतल्या नाहीत. तसेच अंगणवाडी सेविका ANM मार्फत पुरविण्यात आलेल्या IFA गोळ्या लाभार्थींना वाटप केल्याची नोंद नाही.

3. उपरोक्त दिनांक 18 नोव्हेंबर 2015 च्या शासन निर्णयानुसार गरोदर स्त्री व स्तनदा मातेची वाढ तसेच नवजात बालकांचे जन्मापासुनचे वजनाची प्रत्येक महिन्याला नोंदवहीत नोंदी घेण्यात आल्या नाहीत.

4. महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एबावि-2017/प्र.क्र.210/का.6 दिनांक 16/10/2017 नुसार अंगणवाडी केंद्रातील आहार शिजविण्याचे काम स्वयंपाकी नियुक्त करून किंवा महिला बचत गटामार्फत करणे अपेक्षित आहे. तसेच बचत गट उपलब्ध नसल्यास गावातील खाजगी महिलेकडे हे काम देण्याची तरतूद असूनही त्याबाबत कार्यवाही झाल्याचे अभिलेख उपलब्ध नाहीत.

5. अंगणवाडी सेविकांचे बँक पासबुकाची तपासणी केली असता जिवती अंगणवाडी केंद्र क्रमांक 4 व 5 यांनी रक्कम रुपये 3,70,400/- पुरवठादारास धनादेशाने प्रदान न करता रोखीने दिल्याचे नमूद आहे.

6. जिवती अंगणवाडी केंद्र क्रमांक 4 व 5 चे रोखपुस्तक व बँक पासबुक यांची तपासणी केली असता सुरुवातीच्या शिल्लक रकमेमध्ये अनुक्रमे रक्कम रुपये 29,808/- व 87,858/- इतकी तफावत आहे.

तसेच जिवती अंगणवाडी केंद्र क्रमांक 4 च्या दिनांक 31/03/2022 रोजीच्या शिलकेमध्ये रक्कम रुपये 34,021/- इतकी तफावत आहे. म्हणजेच रोखपुस्तक व बँक पासबुक यांचा ताळमेळ घेतला जात नाही.

7. अंगणवाडी केंद्रनिहाय आवश्यक रक्कमेची मागणी न केल्यामुळे रक्कम रुपये 76,73,107/- अखर्चित असल्याचे दिसून येते. योजनेच्या शिल्लक रकमांचा आढावा न घेता मागणी केली असल्याने अनुदानापेक्षा खर्च कमी होऊन माठ्या प्रमाणात रक्कम अखर्चित राहिली आहे.

**4.587 महिला व बालकल्याण विभागातील वाहन भाडे रक्कम प्रदानातील अनियमिततेबाबत.**
**पंचायत समिती कुरखेडा, जिल्हा गडचिरोली, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 4)**

पंचायत समिती कुरखेडा यांनी सन 2021-22 मध्ये अभिकरण निधी मधुन महिला व बालकल्याण विभागा करीता भाडे तत्वावरील वाहनाचे भाडे प्रदानावर एकुण रुपये 2,95,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम 2017 चे कलम 31 (नियम 46) नुसार पूरवठादाराची देयके वस्तु व सेवा करासहीत सादर करणे आवश्यक असताना पुरवठादाराचे देयकात वस्तु व सेवा कर लावल्याचे दिसून आले नाही.

2. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2018/प्र.क्र.144/2018/कोषा.प्रशा.5 दिनांक 28/09/2018 नुसार सेवा पुरवठादाराचे देयकामधुन 2 टक्के GST रुपये 5,900/- TDS स्वरुपात कपात केल्याचे दिसून आले नाही.

3. आयकर अधिनियम 1961 चे कलम 203 आणि आयकर नियमावली 1962 मधील नियम 31(1)(ब) नुसार कंत्राटदारांच्या देयकामधून कपात आयकर रुपये 5,900/- शासन खाती योग्य लेखाशिर्षामध्ये भरणा केल्याचे अभिलेखे व आयकर संबंधित फॉर्म नंबर 16-ए बाबतचा तिमाही अहवाल नस्तीस नाही.

4. महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एबावि-2017/प्र.क्र.348/का-6 दिनांक 30/06/2018 अन्वये प्रति वाहन प्रतिवर्ष रक्कम रुपये 2,50,000/- चे मर्यादेत खर्च करणे आवश्यक असताना रुपये 2,95,000/- खर्च केल्याने विहित मर्यादेपेक्षा रुपये 45,000/- जादा झालेला खर्च अंतिम अमान्य ठरविण्यात आला आहे.

**4.588 एकात्मिक बालविकास व महिला बालकल्याण विभागांतर्गत अंगणवाडी सेविका यांना मोबाईल रिचार्ज देयक मधील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती नांदेड, जिल्हा नांदेड सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 9)**

पंचायत समिती नांदेड यांनी सन 2021-22 मध्ये अंगणवाडी सेविका यांना मोबाईल रिचार्जसाठी रक्कम रुपये 2,40,430/- खर्च केला आहे. याबाबत खालीप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. मुळ परिच्छेदात नमूद केलेप्रमाणे अंगणवाडी सेविका यांची 22 पदे रिक्त असताना एकूण 22 अंगणवाडी सेविकांच्या नावे प्रत्येकी रुपये 1,000/- प्रमाणे रक्कम रुपये 22,000/- नियमबाह्यपणे अदा केलेली रक्कम वसुल करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

2. मुळ परिच्छेदात नमूद दोन्ही देयकात श्रीमती शिंदे शिवलीला जगन्नाथ, अंगणवाडी सेविका, अंगणवाडी तुप्पा -04 व अंगणवाडी तुप्पा -09 यांना दोन अंगणवाडीच्या अनुषंगाने दोन वेळा रक्कम अदा केली आहे. तरी रक्कम रुपये 1,000/- वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**4.589 एकात्मिक बालविकास व महिला बालकल्याण विभागांतर्गत अंगणवाडी स्तरावर CBE कार्यक्रमांतर्गत नियोजन मधील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती नांदेड, जिल्हा नांदेड सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 10)**

पंचायत समिती नांदेड यांनी सन 2021-22 मध्ये अंगणवाडी सेविका यांना अंगणवाडी स्तरावर CBE कार्यक्रमांतर्गत नियोजनासाठी रुपये 3,48,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. मुळ परिच्छदामध्ये नमूद केल्याप्रमाणे अंगणवाडी सेविका यांची 22 पद रिक्त असतानाही एकूण 22 अंगणवाडी सेविकाच्या नावे प्रत्येकी रुपये 1,500/- प्रमाणे रक्कम रुपये 33,000/- नियमबाह्यपणे अदा केलेली रक्कम वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

वाजेगाव -1, वाडी बु-16, गोपाळचावडी-6 आणि बळीरामपूर मिनी या अंगणवाड्यांचे नावांसमोर असलेली खाते कोणाच्या नावाने आहे याबाबत अभिलेखे दर्शविले नाही.

2. मुळ परिच्छदात नमूद प्रमाणक क्रमांक 23 व 28, दिनांक 31/03/2022 या दोन्ही देयकात श्रीमती शिंदे शिवलीला जगन्नाथ अंगणवाडी सेविका अंगणवाडी तुप्पा-04 व अंगणवाडी तुप्पा-09 यांना दोन अंगणवाडीच्या अनुषंगाने दोन वेळा रक्कम अदा केली असल्याने सदर रक्कम रुपये 1,500/- वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**4.590 आय.सी.डी.एस. विभागाने खाजगी वाहन भाड्याने घेणेबाबत.**

**पंचायत समिती तुळजापूर, जिल्हा धाराशिव, सन 2021-2022 (परिच्छेद क्रमांक 20)**

पंचायत समिती तुळजापूरने सन 2021-22 मध्ये आय.सी.डी.एस. विभागासाठी खाजगी वाहन भाड्याने घेतले असून त्यासाठी रुपये 2,44,900/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, नवी मुंबई, महिला व बालविकास विभाग यांचे पत्र क्रमांक एबाविसेयो/का-3/वाहन/3466/18-19, दिनांक 24/09/2018 अन्वये, ग्रामीण प्रकल्प कार्यालयांनी वाहन भाडे तत्वावर घेणेची कार्यवाही संबंधित उपमुख्य कार्यकारी अधिकारी, यांचे मान्यतेने करणेबाबत सूचित केले असताना, फक्त टिप्पणी संचिकेस उपमुख्य कार्यकारी अधिकारी, यांची मान्यता घेतली असून तुळजापुर पंचायत समिती अंतर्गत बाल विकास प्रकल्प विभागाने दरपत्रक प्रक्रिया पुर्णत: आपले स्तरावर राबवली आहे.

2. वाहन क्रमांक एमएच-25-आर-2534 हे प्रस्तुत कार्यालयाकडे 19.04.2021 पासुन ताब्यात आहे. परंतु सदर वाहनाचे दिनांक 01.04.2021 ते 18.04.2021 पर्यंत देयक अदा केन्यामुळे जादा प्रदान रक्कम रुपये 12,199/- संबंधिताकडुन वसुल करणे आवश्यक आहे.

3. संबंधित कंत्राटी वाहनाचे आदेश देण्यापुर्वी जिल्ह्यातील कंत्राटी वाहनाचे प्रचलित दराबाबत जिल्हा परिवहन अधिकारी यांचे कार्यालयाकडून दर मागवून मंजुर केलेल्या दराबाबत खात्री न करता प्रती किलोमीटर रुपये 13.80 प्रमाणे दर निश्चित केले आहेत. सदर मंजुर केलेल्या दराबाबत जिल्हा परिवहन अधिकारी यांचे कार्यालयाकडून खात्री व जादा दराची रक्कम परिगणना करुन वसुली करणे आवश्यक आहे.

4. वाहन क्रमांक एमएच-46-एक्स-0385 व वाहन क्रमांक एमएच-25-आर-2534 या दोन्ही गाडीचे लॉगबुक एकच आहे व त्यावर वाहनाचे वाहन क्रमांक नमुद नाहीत. सदर लॉगबुकची पडताळणी केली असता सदर लॉगबुक हे एकाच हस्ताक्षरात व एकाच पेनने लिहिलेले आहे. त्यामुळे सदर लॉगबुक हे मॅनेज केल्याचे दिसुन येते. तसेच वरील दोन्ही वाहने वापरणाऱ्या अधिकारी यांनी लॉगबुक वर सही केलेली नाही. दोन्ही वाहनाचे मीटर रिडींग न नोंदविता प्रत्येक महिन्यात मीटर रिंडींग ही 00 पासुन सुरुवात केली आहे. त्यामुळे वाहन वापरणाऱ्या अधिकारी यांनी सदर लॉगबुकचे रिडींग वाहन चालकाने बरोबर नमुद केले किंवा नाही याची तपासणी करुन प्रमाणित करणे आवश्यक आहे. परंतु या प्रमाणे तपासणी न करता किंवा खात्री न करता संबंधित वाहनाच्या ठेकेदारास सर्व रक्कम अदा केल्याचे दिसुन येते.

*****